SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

(असाधारण)

मंगळवार, दिनांक २४ जुन, २०२५

निदेश

क्र.: ४३/२०२५ दिनांक : २४/०६/२०२५

विषय :-अखिल भारतीय तंत्र शिक्षण (AICTE) अंतर्गत अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय/संस्थामध्ये शिक्षकांची (ग्रंथपाल/शारीरिक शिक्षण संचालक) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३-A-1) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने पदोन्नतीचे मान्यता पत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निदेश - २०२५.

ज्याअर्थी केंद्र शासनाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीच्या अनुषंगाने विद्यापीठ व उपरोक्त महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षकांच्या सेवाशर्ती व वेतन लागू केले आहे, व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विनियम -२०१९ निर्गमित केले आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णय क्र. सविआ-११११/प्र.क्र. ४४/१९/तांशि/२ नुसार मान्य केले आहे. यासंबंधात विद्यापीठाने निदेश क्र. ५०/२०१९, विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत, निर्गमित केले आहे,

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त निदेशान्वये शिक्षकांना (ग्रंथपाल/संचालक, शारीरिक शिक्षण सह) सहयोगी प्राध्यापकांना (स्तर -१३-A-1) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर पदोन्नती देण्याबाबत सदर शासन निर्णयात (निदेश क्र. ५०/२०१९) तरतूद करण्यात आली आहे. व त्यांचे कार्याचे मूल्यमापन करण्याची तरतूद विहीत करण्यात आली आहे. तसेच या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. २.९ नुसार संबंधितांना स्थान निश्चितीबाबत अर्ज प्राचार्यांना सादर करावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाचे विद्या परिषदेने दि. ४.१२.२०२० च्या सभेत विषय क्र. ९६ (अ) अन्वये सहयोगी प्राध्यापकांच्या (स्तर -१३A) प्राध्यापक (स्तर १४) पदावर पदोन्नती बाबत निवड समितीने केलेल्या शिफारसीला विद्यापीठाने मान्यता प्रदान करुन प्राध्यापक म्हणून मान्यतेचे पत्र देण्यात यावे, असे निर्देश दिले आहे.

आणि

ज्याअर्थी, AICTE च्या ६ व्या वेतन आयोगाचे विनियम -२०१० व त्यावर दिनांक २० ऑगष्ट – २०१० च्या शासन निर्णय (निदेश क्र. ६३/२०१०) व नंतर निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार जे शिक्षक प्राध्यापक पदावर स्थानांतरीत झाले आहेत त्यांना "Professor (Academic Level-14 in terms of 7th Pay Commission)" असे पत्र विद्यापीठाकडून सुद्धा द्यावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी निदेश क्र. ५०/२०१९ च्या अनुषंगाने AICTE अंतर्गत महाविद्यालय/संस्थे मधील पात्र सहयोगी प्राध्यापकाला (संचालक शारीरिक शिक्षण/ग्रंथपाल सह) (Academic Level-13-A-1) प्राध्यापक (Academic Level-14) पदावर स्थानांतरण झाल्यावर मान्यता पत्र द्यावयाचे आहे, व त्यासाठी विनियम विहित करावे व ही बाब तातडीने लागू करावयाची असल्याने व्यवस्थापन परिषदेने दिनांक २७/०३/२०२४ च्या सभेत विषय क्र. ३७ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत निदेश प्रसिद्ध करावयाचे निर्देश दिले होते.

आणि

ज्याअर्थी उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने निदेश क्र. ७३/२०२४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा अधिनियम – २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत निर्गमित करण्यात आले होते त्याला व्यवस्थापन परिषदेने विषय क्र. २१३ दिनांक १३.०१.२०२५ च्या सभेत मान्य केले असुन व्यवस्थापन परिषदेने असे निर्देश दिले की सदर विषय सेवा शर्तीच्या संबंधात असल्याने विनियम ऐवजी परिनियमाव्दारे विहीत करावे.

परिनियम विहीत करण्यासाठी काही कालावधीची आवश्यकता असल्याने आणि निर्गमित केलेले निदेश क्र. ७४/२०२४ कलम १२ (८) अंर्तगत ६ महीन्याचा कालावधी संपल्याने अधिक्रमित झाले आहे. यामुळे नविन निदेश निर्गमित करावयाचे आहे.

आणि

त्याअर्थी, मी, प्रा. (डॉ.) मिलींद बारहाते, कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये खालीलप्रमाणे निर्देश देत आहे :-

(१) सदर निदेश "अखिल भारतीय तंत्र शिक्षण (AICTE) अंतर्गत अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय/संस्थामध्ये शिक्षकांची (ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३-A-1) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने पदोन्नतीचे मान्यता पत्र देण्याबाबतची कार्यपध्दती, निदेश -२०२५" म्हणून संबोधण्यात येतील.

(२) सदर निदेश प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

(३) वेगळा संदर्भ नसेल तर-

अ) "शिक्षक" म्हणजे विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम २(६१) नुसार संलग्नित महाविद्यालयातील, सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३-A-1) पदावरील मान्यता प्राप्त नियमित शिक्षक

ब) "महाविद्यालय" म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेले AICTE अंतर्गत अनुदानित अथवा विना अनुदानित अशासकीय अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय किंवा संस्था

(४) स्थाननिश्चिती समितीची सभा आयोजनापुर्वी महाविद्यालयाने विद्यापीठाकडून आवश्यक प्रपत्रे महाविद्यालयीन विभागाकडून किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करावीत.

(५) प्राचार्यांने १५ दिवसांत अर्जदार शिक्षक पात्र असल्यास विद्यापीठाकडे मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी/विषय तज्ञ घेण्याकरिता प्रस्ताव सादर करावा.

(६) सदर समिती करीता मागणी झाल्यानंतर १५ दिवसांच्या आंत विद्यापीठाने समितीवरील प्रतिनिधी/विषय तज्ञ द्यावे.

(७) कार्यवाही करतांना निदेश क्र. ५०/२०१९ मधील दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयात असलेल्या संबंधित सर्व बाबी व तरतुदींचे पालन करण्यात यावे.

(८) समिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद विनियम -२०१९ व त्यावर दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णय (निदेश क्र. ५०/२०१९) नुसारच गठीत करण्यात यावी.

(९) संबंधित असलेल्या निदेश क्रमांक ५०/२०१९ मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीची गणसंख्या (quorum) पूर्ण असावी. तसेच समितीच्या सभेला विहित केलेल्या विषय तज्ञांची उपस्थिती आवश्यक आहे. तसे न आढळल्यास समितीच्या शिफारसी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. याव्यतिरिक्त अनुदानित पदासाठी बैठकीत सहसंचालक (उ. शि.) किंवा त्यांचा प्रतिनिधी (तज्ञ) ची उपस्थिती अनिवार्य आहे.

(१०) समितीच्या शिफारसी त्याच दिवशी समिती मध्ये असलेल्या मा. कुलगुरु नामीत प्रतिनिधी यांना हस्तांतरीत करण्यात याव्यात, व सदर प्रतिनिधीने ७ दिवसांच्या आंत विद्यापीठात सादर कराव्यात.

(११) अनुदानित पदासाठी महाविद्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतोवर १ महिन्याच्या आत विद्यापीठाकडून मान्यता पत्र देण्यात येईल. विनाअनुदानित पदासाठी महाविद्यालयाचे प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिनांकापासून परिपूर्ण प्रस्ताव असल्यास सहयोगी प्राध्यापकाला प्राध्यापक (Level-14) म्हणुन मान्यता पत्र सदर कालावधीत देण्यात येईल.

(१२) ६ व्या वेतन आयोगानुसार प्राध्यापक म्हणुन स्थानांतरण झालेल्या शिक्षकांना "Professor (Academic Level-14 in terms of 7th Pay Commission)" असे पत्र देण्याकरीता महाविद्यालयाने प्रस्ताव सर्व दस्तऐवजासह (समितीची शिफारस, सेवापुस्तिका, अनुदान पदासाठी सह संचालक (उ.शि.) यांचे पत्र इत्यादीची प्रमाणित प्रत, सहा. प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक पर्यंत नियुक्तीला/पदोन्नतीला मान्यता असल्याचे पत्र/दस्तऐवज याची छायांकित प्रत) विद्यापीठाला पाठवावा व सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तपासणी करुन विद्यापीठाने पात्र प्राध्यापकाला "Professor (Academic Level-14 in terms of 7th Pay Commission)" असे मान्यतेचे पत्र शक्यतोवर १ महिन्याच्या आंत द्यावे.

(१३) निदेश क्र. ७४/२०२४ अधिक्रमित झाले आहे.

स्वा/-

दिनांक : २१/०६/२०२५

(डॉ. मिलिंद बारहाते)
कुलगुरु
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****